गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ७९ वा ● शुक्रवार ०४ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 79 | Date : 04/08/2023 | blow : Friday | Page 4 | Price 4

## महसुल अदालतीचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः महसुल विभागामार्फत राज्यात दि.०१ ऑगस्ट महसुल दिन पासुन महसुल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दि. ०४ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता बहुउद्देशिय सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय आवार , सिध्देश्वर पेठ , सोलापूर येथे महसूल अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जन संवाद अंतर्गत महसुल अदालतीचे दि. ०४ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले असुन उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात जी अर्धन्यायीक प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहे. त्या प्रकरणामध्ये ज्या वादी व प्रतिवादी यांना त्यांचे दाखल प्रकरणामध्ये तडजोड करावयाची आहे अशा प्रकरणी वादी व प्रतिवादी यांनी तडजोडनामा घेवुन दि. ०४ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता बहुउद्देशिय सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ , सोलापूर येथे उपस्थित रहावे जेणेकरुण आपले दाखल अपिलामध्ये कार्यवाही करून अपील अर्ज निकाली काढणेबाबतची कार्यवाही करणे सोईचे होईल.असे आवाहन उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले आहे.

## लोकसभेत डेटा संरक्षण बिल सादर, उल्लंघन केल्यास कंपन्यांना बसणार २५० कोटीपर्यंत दंड

नवी दिल्ली : केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी (३ ऑगस्ट) लोकसभेत डेटा संरक्षण विधेयक २०२३ सादर केले. हे विधेयक लोकसभेत आवाजी मतदानाने मांडण्यात आले आहे. या प्रस्तावित कायद्याला विरोधी पक्षाच्या खासदारांनी आक्षेप घेतला आणि तो संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी केली. या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाकडून यापूर्वीच मंजुरी मिळाली आहे. नव्या डेटा संरक्षण विधेयकामुळे सोशल मीडिया कंपन्यांच्या मनमानीला आळा बसेल अशी अपेक्षा केंद्र सरकारने व्यक्त केली आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान गुरुवारी, ३ ऑगस्ट रोजी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल, 2023(DPDP) सादर केले. नवीन डेटा



संरक्षण विधेयक सोशल मीडिया कंपन्यांवर लगाम घालण्यास आणि त्यांची मनमानी कमी करण्यास मदत करेल असं ते म्हणाले.

नवीन डेटा संरक्षण विधेयक २०२३ नुसार, वापरकर्त्यांच्या डिजिटल डेटाचा गैरवापर करणार्या किंवा त्यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरणार्या संस्थांना २५० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थेला कमाल २५० कोटी रुपये आणि किमान ५० कोटी रुपये दंड होऊ शकतो. नवीन विधेयक नागरिकांचे खासगी अधिकार तसेच डेटा हाताळणी आणि प्रक्रिया करणार्या संस्थांच्या जबाबदाऱ्या नमूद करते. या विधेयकांतर्गत, केंद्र सरकारला बोर्डाकडून लेखी संदर्भ मिळाल्यानंतर सामान्य लोकांच्या हितासाठी सोशल मीडियावरील कंटेंट ब्लॉक करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे.

**विधेयक नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करेल: राजीव चंद्रशेखर**

इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर म्हणाले की, संसदेने मंजूर केलेले हे विधेयक सर्व । **पान २ वर**

## मोटार वाहन ते पर्यावरण, कॉपीराईट ते अन्न सुरक्षा, छोट्या उद्योगांना मोठा दिलासा...

# जन विश्वास विधेयक मंजूर!

नवी दिल्ली : लोकसभेनंतर राज्यसभेतही बहुचर्चित जनविश्वास विधेयक मंजूर झालं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी हे विधेयक बुधवारी (२ ऑगस्ट) राज्यसभेत मांडलं. छोट्या व्यापाऱ्यांना मोठा दिलासा देणाऱ्या या विधेयकाला मंजुरी मिळाल्यामुळे व्यापारी वर्गात आनंदाचं वातावरण आहे. छोट्या छोट्या कायद्याचं उल्लंघन केल्यानंतर होणारी तुरुंगवासाची शिक्षा बदलून, तिचं रुपांतर आर्थिक दंडात करण्यात आलं आहे. क्लिष्ट कायद्याच्या बंधनात अडकल्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यास अडथळे येत होते. हे अडथळे दूर



करण्याचं काम जन विश्वास विधेयकाने केलं आहे. अनेक जुन्या कायद्यांत बदल करुन जन विश्वास विधेयक आणलं आहे. या विधेयकामुळे तब्बल ४२ कलमांतर्गत छोट्या छोट्या गुन्ह्यांमध्ये होणाऱ्या गुन्ह्यांना शिक्षेपासून मुक्तता देण्यात आली आहे. जेलवारी ऐवजी गुन्हेगारांना आर्थिक दंड ठोठावला जाणार आहे. हे तेच छोटे छोटे कायदे आहेत ज्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यात अनेक अडथळे येत होते. या विधेयकामुळे व्यापाऱ्यांना खुल्या मनाने व्यवसाय करण्याला चालना मिळेल.

मोदी सरकारने २२ डिसेंबर २०२२ रोजी जन विश्वास विधेयक लोकसभेत मांडलं होतं. त्यानंतर संयुक्त संसदीय समितीकडे हे विधेयक पाठवण्यात आलं होतं. मार्चमध्ये या विधेयकाला अंतिम रुप । **पान २ वर**

## देशात वर्षाला १५००० हून अधिक लोकांचं अवयव दान

### केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. मनसुख मांडविया

नवी दिल्ली : दुसऱ्या व्यक्तीला जीवनदान देण्यासारखी मानवतेसाठी दुसरी मोठी सेवा असू शकत नाही, असे वक्तव्य केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केलं. वर्षाला १५,००० हून अधिक लोक अवयव दान करत असल्याचे ते म्हणाले. १३ व्या भारतीय अवयव दान दिन (आयओडीडी) समारंभात ते बोलत होते. यावेळी मृत व्यक्तीच्या कुटुंबियांनी त्यांच्या प्रिय व्यक्तीचे अवयव दान करण्याच्या धाडसी निर्णयाबद्दल तसेच मृत व्यक्तींच्या अवयव दानाबद्दल जनजागृती केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. अवयव दान आणि प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचाही सन्मान करण्यात आला. या समारंभाला संबोधित करताना डॉ. मांडविया म्हणाले की, । **पान २ वर**



## सैनिकी वसतीगृहात माफक दरात प्रवेश

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखाली सुंदरमनगर. विजापूर रोड, सोलापूर येथे सैनिकी मुलां व मुलींचे वसतीगृह चालविण्यात येत आहे. आजी व माजी सैनिकांच्या तसेच विधवांच्या पाल्यांना तेथे सवलतीच्या दरात निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध असून, दि.३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत वसतीगृह अधिक्षक अधिक्षीका यांचे कडे अर्ज सादर करावेत. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. आजी व माजी सैनिकांचे तसेच सैनिक विधवांचे पाल्य सोलापूर येथील शैक्षणीक संस्थेत इयत्ता ८ वी ते पुढील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत आणि जे वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी वसतीगृह अधिकक्षक, अधिक्षीका यांचे कडून ५० रु.ची प्रवेश पुस्तीका घेऊन अर्ज दि.३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज सादर करावेत तसेच वसतीगृह दि.०१ सप्टेंबर २०२३ पासून सुरू करण्याचे प्रस्तावति आहे. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे

## दिव्यांग महिलेचे तक्रार ऐकून घेण्यासाठी जिल्हाधिकारी आले थेट कंपाउंड मध्ये..

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा प्रशासन यंदा महसूल सप्ताह साजरा करीत आहे. संपूर्ण आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांसह तलाठ्यांपर्यंत सर्वच नागरिकांच्या दारोदारी जाणार आहेत. एक ऑगस्ट रोजी पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी बाळे येथे महसूल दिनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. नागरिकांना त्यांच्या हस्ते विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. एकीकडे असे चित्र असताना दुसरीकडे मात्र जिल्हाधिकारी कार्यालयात दोन्ही पाय नसलेली एक दिव्यांग महिला खाटासह दाखल झाली.

कर्मचारी संघटनेचे शंतनू गायकवाड यांनी त्यांची विचारपूस करून निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्याशी समन्वय साधला. त्या दिव्यांग महिलेचे नाव आहे सुचित्रा वसंतराव गिराम.

पत्रकारांना जेव्हा ही माहिती मिळाली तेव्हा त्यांनी या दिव्यांग महिलेकडून माहिती घेतली त्या महिलेने सांगितले की, मी रत्नदीप हौसिंग सोसायटी येथील रहिवासी आहे. माझे वडील भारतीय सैन्यात होते, मी दिव्यांग आहे या सोसायटीमध्ये आमचे घर एका कोपऱ्यात असून या सोसायटीमध्ये झालेले अतिक्रमण आणि माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या प्रशालेने भिंत बांधल्याने जो नैसर्गिक सांडवा होता तो अडून पावसाच्या निचऱ्याचे पाणी थेट या आमच्या घरात घुसत आहे. हे अडचण मागील अनेक वर्षापासून आहे आम्ही या प्रकरणी वारंवार पाठपुरावा केला परंतु महानगरपालिकेने दुर्लक्ष केले, त्यामुळे नाईलाजाने मला जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन माझ्या मागणीकडे लक्ष वेधवे लागले



असल्याचे सांगितले.दरम्यान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना हि माहिती मिळताच त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कंपाउंड मध्येच त्या दिव्यांग महिलेची भेट घेतली आणि त्यांची तक्रार ऐकून घेतली तसेच याबाबत कार्यवाही करण्याची ग्वाही देखील त्यांनी दिली, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याच्या कार्यपद्धतीमुळे त्यांचे कौतुक होत आहे.

## ‘मोदी’ आडनावावरील टिप्पणीबद्दल माफी मागणार नाही : राहुल गांधी

नवी दिल्ली : ‘मोदी’ आडनावावरून केलेल्या टिप्पणीबद्दल आपण दोषी नसून याप्रकरणी माफी मागणार नाही, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. याप्रकरणी फिर्यादीशी तडजोड करायची असती तर ती यापूर्वीच केली असती, असेही त्यांनी सांगितले. मानहानी खटल्यात सुरत महान्यायदंडाधिकाऱ्यांनी दोषी ठरवलेल्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी विनंती राहुल यांनी सर्वोच्च न्यायालयाला केली. लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदींअंतर्गत गुन्हेगारी प्रक्रिया आणि त्याच्या परिणामाचा वापर करून याचिकाकर्त्यांचा दोष नसतानाही त्याच्यावर माफी मागण्यासाठी दबाव टाकला जात आहे, हा न्यायालयीन प्रक्रियेचा अतिशय गैरवापर आहे असा आरोप राहुल यांनी केला आहे. राहुल यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार त्यांची खासदारकी रद्द झाली आहे.





## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते लाभार्थ्यांना शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप

सोलापूर/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील काळेगाव येथे महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले. यामध्ये शिधापत्रिका, दाखले, मोफत सातबारा तसेच पंचायत समिती विभागाकडील ग्रामपंचायत निधीतून दिव्यांगासाठी पाच टक्के निधीचे चेकही लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले अक्कलकोट तहसीलदार बाळासाहेब शिरसाट तसेच अन्य तालुकास्तरीय अधिकारी, ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील प्राथमिक शाळेच्या आवारात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी शाळेची पाहणी केली. तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून शाळेविषयी व अभ्यासक्रमाविषयी माहिती घेतली. त्यांच्याशी हास्यविनोद करत शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप ही त्यांनी केले.

**ई–पीक पाहणी प्रात्यक्षिक –** यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काळेगाव येथील तलाठ्याकडून खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन ई पीक पाहणीचे प्रात्यक्षिक करून घेतले.

## ठाणे येथे राज्यातील पहिले ‘अवयवदान जनजागृती उद्यान’: मुख्यमंत्री

मुंबई : देशभरात आज ‘राष्ट्रीय अवयवदान दिवसख्र साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने अवयवदानाबाबत जनजागृतीसाठी प्रयत्नांचा भाग म्हणून राज्यातील पहिले ‘अवयवदान जनजागृती उद्यानख्र ठाण्यात तयार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच भविष्यात अशा स्वरूपाचे उद्यान राज्यातील इतर शहरात महापालिका आणि नगरपरिषदेतर्फे चालू करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, राज्यातील हे पहिले उद्यान कै. इंदिरा बाबुराव सरनाईक उद्यान, कम्युनिटी पार्क, पोखरण रोड नं २, येथील ६ हजार चौरस मीटरच्या जागेवर तयार करण्यात येणार आहे. या ठिकाणी अवयवदान संदर्भातील माहिती पुस्तिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उद्यानाची योग्य पद्धतीने देखभाल करण्यासाठी महापालिकेतर्फे कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. प्रस्तावित उद्यानात मूत्रपिंड (किडनी), यकृत ( लिव्हर), हृदय, फुफ्फुस, स्वादुपिंड, छोटे आतडे, डोळे, त्वचा, हाडे, हात या अवयवाच्या आणि पेशींच्या प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. तसेच या अवयवांसंदर्भातील माहिती त्याठिकणी मोठ्या फलकावर लावण्यात येईल. अवयवदानासंदर्भातील शास्त्रीय स्वरूपाची माहिती या ठिकाणी देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उद्यानात अवयव दान करण्याचा प्रतिज्ञा अर्ज नागरिकांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. ज्या नागरिकांना हा अर्ज भरायचा आहे त्यांच्याकडून तेथेच भरून घेण्यात येईल. त्यानंतर तो अर्ज नोंदणीकरिता राज्य अवयव आणि उतीपेशी प्रत्यारोपण संस्था या राजस्तरीय संस्थेच्या कार्यालयात सुपूर्द करण्यात येईल.

अवयव दान ही काळाची गरज आहे, याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता आल्यास अनेक जीव वाचण्यास मदत होणार आहे. यासाठी शासकीय आणि सामाजिक स्तरावर अवयवदानाबाबत जनजागृतीसाठी प्रयत्न केले जात आहेत.

या विषयवार अधिक व्यापक प्रमाणात जनजागृतीची व्हावी आणि अवयवदानासंदर्भात सोप्या पद्धतीने माहिती उपलब्ध व्हावी, याकरिता ठाणे येथील उद्यान महत्वाचे असणार आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर अवयवदानाचे अर्ज भरुन शासनाच्या मोहिमेला प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी यानिमित्ताने केले आहे.

सध्याच्या घडीला एक मेंदूमृत व्यक्ती अवयवदान करून ८ व्यक्तींना जीवनदान देऊ शकते. गेल्या काही वर्षांत अवयव निकामी झालेल्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यातच वैद्यकीय विश्वातील प्रगतीमुळे अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहे. त्यामुळे अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण पुढे येत आहे. मात्र मेंदूमृत व्यक्तीकडून अवयवदान होण्याची संख्या आणि अवयवाची गरज असणाऱ्या रुग्णांची संख्या यामध्ये मोठी तफावत आहे.

ती दूर करण्यासाठी मेंदूमृत अवयवदान मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. सध्या राज्यात अवयव प्रत्यारोपणासाठी मोठ्या प्रमाणावर रुग्ण प्रतिक्षेत आहेत. यात किडनी प्रत्यारोपणासाठी – ५,८३२, लिव्हर प्रत्यारोपणासाठी – १,२८४, हृदय प्रत्यारोपणासाठी – १०८, फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी – ४८, स्वादुपिंड प्रत्यारोपणासाठी – ३५, छोटे आतडे प्रत्यारोपणासाठी – ३ एवढे रुग्ण प्रतिक्षेत आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



**❋ सुविचार ❋**

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### उपाय योजनांची गरज...

पूर्वी रस्ते अरुंद होते, वाहनांची संख्या मर्यादित होती. मात्र, अलीकडच्या गेल्या वीस वर्षांत औद्योगिकीकरणामुळे वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. वाहने अधिक रस्ते अरुंद अशी स्थिती सर्वत्र पाहायला मिळते. महानगरांमधील वाहतूक कमी वेळेत व कमी खर्चात होण्यासाठी देशातील सर्वात महागड्या समृध्दी महामार्गाची संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमलात आणली. मुंबई आणि नागपूरला जोडणाऱ्या या समृध्दी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण अलीकडेच मोदी यांनी केले. अतिशय मोठ्या महत्त्वाकांक्षेने बांधलेला हा समृध्दी महामार्ग सुरक्षेऐवजी धोकादायक वाटू लागला आहे. या मार्गावरुन वाहने सुसाट धावतात. वेग मर्यादेवर नियंत्रण नसल्याने अपघातांची संख्या वाढली आहे. अपघातांची मालिका थांबायला तयार नाही. महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणून या समृध्दी महामार्गाची ओळख बनण्याऐवजी ती मरणाची 'समृध्दी' बनली आहे. गेल्या एक जुलै रोजी या मार्गावरील बुलडाण्याजवळ खासगी बसचा अपघात होऊन त्यामध्ये २६ पेक्षा अधिक लोकांचा बळी गेला. पेटलेल्या बसमध्ये या प्रवाशांचा कोळसा झाला. वेळेत मदत मिळाली असती तर कदाचित यातील काही लोकांचे प्राण वाचू शकले असते. मात्र, सुरक्षेपेक्षा गतीला अधिक महत्त्व दिल्याने ही 'समृध्दी' मृत्यूचा महामार्ग बनला आहे. गेल्या सहा महिन्यात या महामार्गावर ३६८ पेक्षा अधिक अपघात होऊन १०२ पेक्षा जास्त लोकांना प्राण गमवावे लागले. तर १५० हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. चालकाच्या निष्काळजीपणामुळे १०६ अपघात झाल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. आतापर्यंत सर्वाधिक १८० अपघात एकट्या बुलडाणा जिल्ह्यात झाले आहेत. ठाणे जिल्ह्यात सरलांबे येथे समृध्दी महामार्गावरील पुलाचे काम चालू असताना गर्डरसह महाकाय क्रेन कोसळून झालेल्या दुर्घटनेत वीस कामगारांचा जागीच मृत्यू झाला. गेल्या महिनाभरात घडलेला हा दुसरा मोठा अपघात आहे. लाखो कोटी रुपये खर्चून बांधलेल्या या समृध्दी महामार्गावर होणारे अपघात हे दुर्दैवीच म्हटले पाहिजे. या मार्गावर होणाऱ्या अपघातांची कारणे शोधून त्यावर केंद्र आणि राज्य सरकारच्या तज्ज्ञ समितीने उपाय योजण्याची गरज आहे.

# शेतकरी बांधवांनो, पीक विमा काढलात का?

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी केंद्र शासनासोबतच राज्य सरकार अहोरात्र प्रयत्न करत आहे. सध्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेला राज्यातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या विशेष प्रयत्नातून राज्यातील शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजनेत अर्ज करण्यासाठी मुदतवाढीची विशेष सवलत देण्यात आली आहे. ही सवलत एकूण तीन दिवसांची असून, ती ३ ऑगस्ट २०२३ पर्यंत राहणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी गुरुवार, दि. ३ ऑगस्टपर्यंत खरीप हंगामातील पिकांचा विमा उतरवून घ्यावा




ऐन पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांवर, खते, बी–बियाणे, किटकनाशके विकत घेण्यावर शेतकऱ्यांना पदरमोड करून ती खरेदी करत पुरेसा पाऊस पडताक्षणी पेरणी करावी लागते. बरेचदा शेतकरी कमी पाऊस पडल्यानंतरही पेरणी करत दुबार पेरणीचा धोका पत्करतात. यात त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक झळ बसते. वेळप्रसंगी ती सोसतातही. बळीराजाचे हे होणारे नुकसान टाळण्यासाठी, त्याला हातभार लागावा, त्यांना ऐनवेळी केवळ जवळ पैसे नसल्यामुळे पीक विमा भरता येत नाही. परिणामी भविष्यात त्याचे नैसर्गिक आपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी यंदाच्या खरीप हंगामात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पीक विमा योजनेत केवळ एका रुपयामध्ये शेतकऱ्याच्या हिश्श्याची रक्कम भरून एका हंगामातील पिकाचा विमा उतरविता येणार आहे. अनेक शेतकरी तो विमा उतरवितही आहेत. मात्र अद्यापही ज्या शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांचा विमा उतरविला नाही, त्या शेतकरी बांधवांनी पुढील दोन दिवसांमध्ये पीक विमा काढून आपले पीक संरक्षित करून घ्यावे.

खरीप हंगामातील अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून ३ वर्षांसाठी निवड करण्यात आली आहे

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेची उद्दिष्ट्ये**

नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतक–यांना विमा संरक्षण देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतक–यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, शेतक–यांना नाविन्यपूर्ण व सुधारीत मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरून उत्पादनातील जोखमींपासून शेतक–यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतू साध्य होण्यास मदत होईल, ही या योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत.राज्यातील शेतकऱ्यांचा 'आपल्या विम्याचा राज्य सरकारने उचलला भार, प्रति अर्ज १ रुपया देउनी आजच नोंदवा आपला सहभाग' असे सांगत राज्य शासनाचा कृषी विभाग मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना प्रवृत्त करत आहे. शेतकऱ्यांना पीक विमा नोंदणीसाठी जवळच्या त्यांचे खाते असलेल्या बँक शाखेत, सीएससी केंद्र, पोस्ट ऑफिस किंवा प्रधान मंत्री शेतकरी विमा योजना पोर्टलवरूनही हा विमा भरता येणार आहे.

सन २०२३–२४ पासून सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने शेतकरी हिश्श्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून योजनेतील सहभागाची नोंदणी करता येत आहे. पीक विमा योजनेत सहभागाची नोंदणी करण्यासाठी सामूहिक सेवा केंद्रधारकाला विमा कंपनीमार्फत प्रती अर्ज ४० रुपये रक्कम देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून पीक विमा हप्ता प्रति अर्ज १ रुपयाव्यतिरिक्त कुठलाही अतिरिक्त शुल्क घेता येणार नाही.

**खरीप हंगामातील ही पिके एक रुपयात संरक्षित होणार**

यंदाच्या खरीप पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी सोयाबीन आणि कापूस ५५ हजार, मूग आणि उडीद २२ हजार, तूर ३६ हजार ८०२, ज्वारी २९ हजार ७५० आणि बाजरी २४ हजार रुपये प्रति हेक्टरी पीक संरक्षणाचा लाभ मिळणार आहे.

या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग ऐच्छिक असून, योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास ते योजनेत सहभागी होत नसल्याबाबतचे घोषणापत्र सात दिवसांपूर्वी बँकेत देणे बंधनकारक होते. हे घोषणापत्र बँकेत सात दिवसांपूर्वी दिले असल्यासच बँक विमा हप्ता रक्कम कपात करणार नाही.

**आपत्तीमध्ये पीक बाधित झाल्यास हे करा**

शिवाय भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणीपश्चात नुकसानामुळे बाधित विमाधारक शेतकऱ्याने घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत सूचना प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या पवर देणे आवश्यक आहे. किंवा विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर कॉल करणे किंवा तक्रारीचा लेखी अर्ज देणे आवश्यक आहे. कृषी विभाग, पीक विमा सुविधा केंद्र किंवा बँकेत जावून ही माहिती लेखी स्वरुपात शेतकऱ्याला देता येईल. या माहितीमध्ये शेतकऱ्याचे नाव, पीक विमा पावती क्रमांक, मोबाईल क्रमांक, आपत्तीचा प्रकार, बाधित पिकानुसार गट क्रमांक इत्यादी माहिती नमूद करून देणे अत्यंत गरजेचे आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीमध्ये भात पीक जलमय झाल्यास तसेच कापूस पीक काढणी पश्चात आपत्तीमध्ये संरक्षित नसल्यामुळे शेतक–यांनी या बाबी ध्यानात घेणे आवश्यक आहे.

राज्यातील शेतकऱ्यांचे खरीप हंगामाचे पीक विमा काढून संरक्षित करण्यासाठी ३१ जुलै २०२३ ही शेवटची मुदत होती. त्यात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे विनंती करत मुदतवाढ मागवून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. अगदी एका रुपयात आपल्या शेतातील खरीप हंगामातील पिकाचा विमा उतरून शेतकरी बांधवांना त्याचे पीक संरक्षित करता यावे, यासाठी हा अवधी मागितला आहे. परभणी जिल्ह्यात यंदा खरिपाचे एकूण ५ लाख ५९ हजार ९९२ हेक्टर क्षेत्र असून अंदाजे ४ लाख ४३ हजार ८४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यावर्षी पाऊस उशिरा सुरू झाल्याने खरिपातील पेरण्यांना उशीर झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांचे नैसर्गिक आपत्तीतील पूर, अतिवृष्टी, पावसाच्या सातत्यामुळे पिकांचे होणारे नुकसान, पिकांची आणेवारी, उतारात येणारी घट, दुष्काळ, टोळधाड किंवा अन्य आपत्तींपासून तसेच वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी वरीलप्रमाणे पिकांचा विमा उतरवणे आवश्यक आहे.– **प्रभाकर बारहाते, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, परभणी**

पान १ वरुन

### लोकसभेत डेटा संरक्षण बिल सादर,

नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करेल, नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्थेचा विस्तार करण्यास मदत करेल. राष्ट्रीय सुरक्षा किंवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये सरकारला अतिरिक्त कायदेशीर अधिकार प्राप्त करून देईल.

**डेटा संरक्षण विधेयकाला विरोधकांचा विरोध**

लोकसभेत सादर करण्यात आलेल्या डेटा प्रोटेक्शन बिल २०२३ ला तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगता रॉय, काँग्रेस खासदार मनीष तिवारी आणि –खचखच् खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी विरोध केला. डेटा संरक्षण विधेयकाला विरोध करताना काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी म्हणाले की, माझा या विधेयकाला विरोध आहे. या विधेयकाच्या माध्यमातून सरकारला माहितीचा अधिकार पायदळी तुडवायचा आहे. त्यामुळे अशा उद्दिष्टाला आम्ही विरोध करू. हे विधेयक चर्चेसाठी स्थायी समितीकडे पाठवावे.

### देशात वर्षाला १५००० हून

या कार्यात सहभागी झालेल्या सर्व लोकांच्या योगदानाची ओळख करुन त्यांचे कौतुक करणे महत्त्वाचे आहे. २०१३ मध्ये ५००० लोक अवयव दान करण्यासाठी पुढे आले होते. आता वर्षाला १५,००० हून अधिक लोक अवयव दान करत असल्याची माहिती मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. अवयवदानात वाढ व्हावी यासाठी केंद्र सरकारनं अनेक पावले उचलली असल्याची माहिती केंद्रीय मंत्र्यांनी दिली. देशात अवयवदानाबाबत अधिक जनजागृती करण्यासाठी अधिकची धोरणे आणि सुधारणा आणण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे डॉ. मांडविया म्हणाले. अवयवदाते, त्यांचे कुटुंबीय आणि नागरी समाजातील सदस्यांच्या योगदानाचे डॉ. मांडविया यांनी कौतुक केले. त्यांच्या प्रेरक हेतूचे आणि समर्पणाचेही त्यांनी कौतुक केले. यावेळी नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन (NOTTO) ई–न्यूज लेटर, ट्रान्सप्लांट मॅन्युअल( (प्रत्यारोपण अहवाल) आणि ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर (प्रत्यारोपण समन्वयक) प्रशिक्षणासाठीच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाचे प्रकाशन करण्यात आले. याच कार्यक्रमादरम्यान, आयसीएमआर (ICMR) ची 'मेक इन इंडिया' उत्पादने जसे की, नॉव्हेल हिमोफिलिया ए रॅपिड कार्ड टेस्ट आणि वॉन विलेब्रँड डिजीज रॅपिड कार्ड टेस्ट आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आंतरराष्ट्रीय आरोग्य विभागाच्या, ई केअर (eC-RE) पोर्टलचे (ई–क्लिअरन्स ऑफ आफ्टर लाईफ रीमेन्स) लोकार्पणही केंद्रीय आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.जेव्हा एखाद्या व्यक्तीचा दुसऱ्या देशात मृत्यू होतो, तेव्हा मृत व्यक्तीचे पार्थिव भारतात परत आणण्यासाठी अनेक कागदपत्रे आणि प्रक्रिया कराव्या लागतात. ज्यामुळं कुटुंबीय आणि मित्र परिवाराला निराशेचा सामना करावा लागतो. या समस्येची संवेदनशीलता समजून घेऊन आणि किमान सरकार आणि जास्तीत जास्त प्रशासन या तत्त्वाचे पालन करण्यात येत आहे. या माध्यमातून भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने विविध देशांमधून पार्थिव शरीर भारतात परत आणण्याची प्रक्रिया सुलभ आणि जलद करण्यासाठी ई–केअर (ई–क्लिअरन्स ऑफ पोस्ट–लाइफ रिमेन्स) पोर्टल सुरू केले आहे.

### जन विश्वास विधेयक मंजूर!

देण्यात आलं. लोकसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यसभेतही त्याच्यावर मंजुरीची मोहोर उटवली.

या विधेयकात विशेष काय?

या विधेयकात १९ मंत्रालयाशी संबंधित ४२ अधिनिमयांच्या १८३ तरतुदींमध्ये संशोधनाचा प्रस्ताव देण्यात आला होता.

यामध्ये सार्वजनिक कर्ज कायदा १९४४, फार्मसी अधिनियम १९४८, सिनेमॅटोग्राफ अधिनियम १९५२, कॉपीराईट अधिनियम १९५७,ट्रेड मार्क्स अधिनियम १९९९, रेल्वे अधिनियम १९८९, माहिती तंत्रज्ञान कायदा२०००, औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०, मोटार वाहन कायदा १९८८, अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६, मनी लाँडरिंग प्रतिबंध कायदा २००२, पेटंट कायदा१९७०, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, मोटार वाहन कायदा १९८८ यासह ४२ कायद्यांचा समावेश आहे.

या कायद्यांशी संबंधित होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये आता तुरुंगावारीची शिक्षा बदलून दंडाचा निकष लावण्यात आला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना कोर्ट–कचेरीपासून मुक्तता मिळणार आहे. शिवाय व्यवसाय करणे आणखी सुरळीत होणार आहे.

**जन विश्वास विधेयकामुळे व्यवसायात सुलभता**

– झाडे तोडल्यास किंवा जाळल्यास आता जेलऐवजी दंडाची तरतूद

– वायू प्रदूषण करणाऱ्या कंपन्या, उद्योगांना मोठा आर्थिक दंड

– वायू प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपनीला जेलऐवजी १५ लाखांचा दंड

– संवाद माध्यमांमध्ये चुकीची माहिती किंवा आक्षेपार्ह मेसेजला आता जेलऐवजी तुरुंगवासाची शिक्षा

– रेल्वे स्थानकांवर भीक मागणाऱ्यांना भिकाऱ्यांना यापुढे तुरुंगवासाची शिक्षा नाही

प्रश्न – जन विश्वास विधेयकाचा उद्देश काय? नव्या विधेयकामुळे व्यवसाय करणे सोपे कसे होईल?

उत्तर – अनेक जुन्या कायद्यांमध्ये संशोधन करुन जन विश्वास विधेयक आणलं आहे. ४२ कायद्यांमध्ये छोट्या गुन्ह्यांसाठी जेलची शिक्षा आर्थिक दंडात बदलली आहे. त्यामुळे छोटे उद्योग करणाऱ्यांना क्लिष्ट नियमांमुळे बंधने येणार नाहीत.

प्रश्न – या विधेयकात नेमक्या तरतुदी कोणत्या? कोणत्या क्षेत्रात बदल होतील?

उत्तर – जन विश्वास विधेयकाचं लक्ष्य पर्यावरण, कृषी, मीडिया, उद्योग–व्यापार, प्रकाशन यासह ४२ कायद्यांमधील १८० गुन्ह्यांना गुन्हे या श्रेणीतून हटवण्यात आलं आहे. ज्या क्लिष्ट तरतुदींमुळे छोट्या व्यवसायांना अडचणी येत होत्या, त्या दूर करण्यात आल्या आहेत.

प्रश्न – अशा कायद्याची आवश्यकता काय?

उत्तर – सूक्ष्म, लघु आणि मध्यम व्यवसाय हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. दरडोई उत्पन्नात याचं महत्त्वाचं योगदान आहे. त्यामुळे या उद्योगांची लालफितीच्या कारभारातून मुक्तता करण्याचा निर्णय सरकारने घेतला. सध्या १५३६ कायदे असे आहेत ज्यामध्ये भारतात व्यापार–उद्योगांना नियंत्रित करणाऱ्या ७० हजार तरतुदी आहेत. या तरतुदींमुळेच छोट्या व्यापाऱ्यांना विस्तार करणे कठीण काम झालं होतं.

**सध्या कोणत्या कायद्यात किती शिक्षेची तरतूद?**

भारतीय वन अधिनियम, १९२७ : आरक्षित वनातील झाडे तोडणे, लाकूड कापणे, अतिक्रमण, यासाठी पूर्वी ६ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा ५०० रुपयांचा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होती. जन विश्वास विधेयकामध्ये तुरुंगवासाची शिक्षा हटवण्यात आली आहे. तर ५०० रुपयांऐवजी ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येणार आहे.

हवा प्रदूषण : हवा प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांना आर्थिक दंडासह ६ वर्षांची जेलवारीची शिक्षा होती. त्यामध्ये बदल करुन आता १५ लाख रुपयांच्या दंड इतकीच शिक्षा ठेवण्यात आली आहे.

माहिती तंत्रज्ञान कायदा : यामध्ये संवाद माध्यमांमधून आक्षेपार्ह मेसेज, चुकीची माहिती पसरवल्यास जेलची शिक्षा होती. शिवाय गोपनियतेचा भंग केल्यास ५ लाखांच्या दंडाची तरतूद होती. शिवाय दोन वर्षांची जेलवारी आणि १ लाखांचा दंड किंवा दोन्ही अशीही शिक्षा होती. मात्र नव्या विधेयकानुसार आता २५ लाखांच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. पर्यावरण संरक्षण : अनावधानाने कायद्याचं उल्लंघन झाल्यास १ लाख ते १५ लाख रुपयांचा दंडाची शिक्षा आहे. पूर्वी या गुन्ह्यात पाच वर्षे कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

कॉपीराईट अधिनियम : आधीच्या कायद्यात अधिकाऱ्यांची फसवणूक,प्रभाव टाकणे, खोटे बोलणे यासाठी तुरुंगवासाची शिक्षा होती ती काढून दंडाची शिक्षा ठेवण्यात आली आहे.

मोटर वाहन अधिनियम : वैध परमिटशिवाय मोटर वाहन चालवणाऱ्यांना सध्ये सहा महिने जेल आणि १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा आहे. यामध्ये बदल करुन दंडाची रक्कम हटवण्यात आली आहे. जेलची शिक्षा कायम ठेवली आहे.

रेल्वे अधिनियम : रेल्वे स्थानकावर भीक मागणाऱ्यांना किंवा फेरीवाल्यांना दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवर अतिक्रमण केलेल्या झोपडपट्टीवासियांना घरे बांधून देण्याचे काम त्वरेने मार्गी लावावे : विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवर अतिक्रमण केलेल्या अतिक्रमकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून या झोपडपट्टीवासियांना उद्यानाबाहेर घरे बांधून देण्याचे काम त्वरेने मार्गी लावावे, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमीनीवरील अतिक्रमण धारकांना घरे मिळाली नसल्याची लक्षवेधी विधान परिषदेत उपस्थित झाल्यानंतर यासंदर्भात अधिक चर्चा करण्यासाठी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात विशेष बैठक घेण्यात आली. यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार महादेव जानकर, आमदार राजहंस सिंह, अपर मुख्य सचिव वल्सा नायर, वन विभागाचे प्रधान सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्याधिकारी मिलिंद बोरीकर, संचालक जी. मल्लिकार्जुन आदी उपस्थित होते.



या उद्यानातील अतिक्रमणधारकांपैकी पहिल्या टप्प्यात पात्र ठरलेल्या अतिक्रमकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना देण्यात आली होती. त्यानुसार संघर्ष नगर चांदिवली येथे ११३८५ पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्यात आले.

यमात्र रक्कम भरण्यास वंचित राहिलेल्या अतिक्रमकांना संधी दिल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात १६६५१ अतिक्रमकांनी रक्कम भरणा केली त्यापैकी १३४८६ अतिक्रमक पुनर्वसनासाठी पात्र ठरले होते. या अतिक्रमकांना घरे बांधून देण्याच्या संदर्भात या बैठकित चर्चा करण्यात आली.

अतिक्रमकांमध्ये आदिवासी आणि गैरआदिवासी आहेत. या पुनर्वसनाकरिता आरेच्या जागेएवजी दुसरी जागा शोधण्यात यावी असे वनमंत्री यांनी सांगितले. यासंदर्भात एक सर्वसमावेशक समिती स्थापन करून हा विषय वेगाने मार्गी लावण्याचे निर्देश मंत्री श्री मुनगंटीवार यांनी दिलेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बोरिवली ग्रामपंचायत सदस्या अश्विनी कशिवले यांची कार जाळण्याचा प्रयत्न

भिवंडी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील समतानगर येथे रहाणाऱ्या बोरिवली ग्रामपंचायतच्या सदस्या अश्विनी कशिवले यांची स्विफ्ट डिझायर मोटार कार मद्यरात्रीच्या सुमारास जालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दिनांक १ ऑगस्ट



२०२३ रोजी रात्री ३ वाजताच्या सुमारास कशिवले परिवार झोपलेले असताना रूमची काच फुटून आतमध्ये पडली असून, गरम वाफा येवु लागल्याने घरातील सर्व सदस्य घराबाहेर पडले. त्याचं दरम्यान गाडीने पेट घेतला असून, शेजाऱ्यांच्या मदतीने आग विझवण्यात आली. यात स्वीफ्ट डीझायर कार क्रमांक MH-04-GU-6868 चे बंपर पॅनल जळुन खाक झाले आहे. तर कारची टेल लाईट, डीकी, पाठीमागील काच, पाठीमागील डाव्या बाजुचा दरवाजा, पाठीमागील डाव्या बाजुचा टायर, डीझेल टाकी पूर्ण जळून नुकसान झाले आहे. तसेच घरातील समोरील खीडकी जळुन खीडकीच्या काचा फुटुन गेल्या आहेत तर घरातील छताचे लाकडी जळाले आहेत.

कोणीतरी अज्ञात इसमाने कोणतातरी ज्वालाग्रही पदार्थ टाकुण जाळुन नुकसान करून पळून गेला आहे .अशी अज्ञान इसमा विरुद्ध तक्रार बोरिवली ग्रामपंचायतीच्या सदस्या अश्विनी कशिवले यांनी पडघा पोलीस स्टेशनमध्ये केली आहे. तर अज्ञान इसमा विरुद्ध पडघा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून, सदर घटनेचा तपास पडघा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय साबळे करीत आहेत.

मी माझ्या वार्डातील विकासाची कामे हाती घेतली असून, माझं मानसिक खच्चीकरण कसं होईल. माझं काम कसं थांबवण्यात येईल. हा राग मनात ठेवून अज्ञात इसमाने असे वाईट कृत्य केले आहे.मी या घटनेचा निषेध करत. यापुढेही मी अजून ताकदीने लढेन असे यावेळी बोरिवली ग्रामपंचायत सदस्या अश्विनी कशिवले यांनी बोलताना सांगितले.

# दुधनी श्री गुरुशांत लिंगेश्वर कॉलेज मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन

अक्कलकोट /प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री गुरुशांतलिंगेश्वर जुनियर कॉलेज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या एकसे तीन व्या जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केली होती.

सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला दोन्ही महापुरुषांचा तैलचित्रास पुष्पहार अर्पण करुन प्रमुख पाहणे समाज कल्याण सोलापूर कार्यालयाचे बार्टी अधिकारी नालंदा चंदनशिवे म्याडम यांनी पूजन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दुधनी नगरपरिषदेचे निवृत्त अधिकारी शंकर देसाई हे होते.

दिनांक एक ऑगस्ट २०२३ रोजी अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी व लोकमान्य टिळक यांचे



जयंती चे औचित्य साधून सोलापूर समाज कल्याण कार्यालयाचे चंदनशिवे मॅडम,रिपब्लीकन पक्ष(आठवले गट) चे जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी, पाटील सर यांच्या समयोचित भाषणे झाली. याप्रसंगी, चंदनशिवे, रिपाईचे जिल्हा सरचिटणीस सैदप्पा झळकी, दुधनी शहर रिपाईचे अध्यक्ष गोरखनाथ दोडमनी,प्रतिष्ठीत व्यापारी अशोक कबाडे, महेदिमिंया जिडगे, यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

या कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचेप्रतिमापूजन सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न करण्यात आला. व तसेच सर्व मान्यवरांच् शिक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींच्या व तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.सोलापूर समाज कल्याण तर्फे आलेले चंदनशिवे मॅडम यांनी मनोगत व्यक्त करतांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपच्या फॉर्म भरण्यासाठी लागणारे जाती दाखला कसा काढायचा हे माहिती देऊन त्यचे महत्वही सांगण्यात आले आहे. व तसेच आपल्या कॉलेजचे शिक्षक पाटील सर यांनी व तसेच स सैदप्पा झळकी यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाळे सर यांनी केले.शेवटि

आभार बसवराज बंदराड सर यांनी मानले.या कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतली आहे.

# स्वेरीच्या १२ विद्यार्थ्यांची ‘पोझीट सोर्स टेक्नोलॉजी’ या कंपनीत निवड

पंढरपूर/प्रतिनिधीः ‘पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड’ या नामांकित कंपनीने घेतलेल्या कॅम्पस निवड प्रक्रियेतून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १२ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी




दिली.

‘पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड’ या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून राहुल किसन देवकते, भूषण सतिश देशमुख, राहुल किसान गपाट, वैष्णवी मोतीलाल मोरे, गीरीमल्लेश्वर बालाजी नागेल्ली, ज्ञानेश्वर संजीवन लोहार, विठ्ठल अशोक शिरसाळे, गोरक्षनाथ बाळकृष्ण शेजाळ, ओंकार अमसिद्ध बिराजदार, राहुल लक्ष्मीकांत हिंगमिरे, साहिल संतोष कुलकर्णी व तृप्ती सुनील कटकमवार या १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. ‘पोझीट सोर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड’ ही कंपनी आयटी क्षेत्रातील एक नामांकित कंपनी आहे. अशा नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या १२ विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पवईतील रिपब्लिकन कार्यकर्त्याच्या हत्येच्या चौकशीसाठि रिपाइं शिष्ट मंडळाने घेतली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची भेट

## किशोर गायकवाड यांच्या हत्येच्या निषेधार्थ रिपाइंचा पवई पोलिस ठाण्यावर शनिवारी मोर्चा

मुंबई : पवईतील रिपब्लिकन पक्षाचे युवक आघाडीचे विक्रोळी तालुका अध्यक्ष किशोर गायकवाड यांच्या हत्येची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने आज विधानभवन येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची भेट घेऊन चर्चा केली. या प्रकरणी क्राईम ब्रँच द्वारे चौकशी करण्याचे आदेश देत असल्याचे आश्वासन ना.देवेंद्र फडणविस यांनी रिपाइं शिष्टमंडळाला दिले.

रिपाइंच्या या शिष्टमंडळात राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे,रिपाइं चे मुंबई प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ कासारे,मुंबई सरचिटणीस विवेक पवार,कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड,जिल्हाध्यक्ष साधु कटके, प्रकाश जाधव,संजय डोळसे,अजित रणदिवे, रमेश



गायकवाड,संजय पवार,सचिनभाई मोहिते,विजय कांबळे आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्षाचे युवक आघाडीचे विक्रोळी तालुका अध्यक्ष दिवगंत किशोर गायकवाड यांच्या हत्येच्या निषेधार्थ रिपब्लिकन पक्षातर्फे येत्या शनिवारी दि.५ ऑगस्ट रोजी दु.१२ वा. पवई पोलिस ठाणे येथे मोर्चा काढण्यात येणार आहे अशी माहिती रिपाइं चे राज्य सरचिटणिस गौतम सोनवणे आणि मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे यांनी दिली आहे.रिपाइंच्या या मोर्चा चे नेतृत्व रिपाइं चे राष्टीय सरचिटणीस अविनाश महातेकर, ळात राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे,रिपाइं चे मुंबई प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ कासारे,मुंबई सरचिटणीस विवेक पवार,कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड,जिल्हाध्यक्ष साधु कटके, प्रकाश जाधव,संजय डोळसे,अजित रणदिवे, रमेश गायकवाड,संजय पवार,सचिनभाई मोहिते,विजय कांबळे पवई चे बाळ गरुड,राजेश सरकार,भाऊ पंडागळे आदि मान्यवर करणार आहेत.

# समाज जागृतीमध्ये पत्रकारांचा मोलाचा वाटा : महेश साठे

पंढरपूर/प्रतिनिधीः सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये समाज हिताचे कार्य करणे महत्वाचे असून जागृत व सक्षम समाज घडविण्यासाठी पत्रकारांचे काम सर्वोत्तम आहे. माध्यमांच्या माध्यमातून मांडल्या जाणार्या विविध क्षेत्रातील भुमिकांमुळे सामान्य समाजाला न्यायीक अधार मिळत आहे. त्यामुळे सध्या समाज जागृतीमध्ये पत्रकारांचा मोलाचा वाटा आहे. असे प्रतिपादन शिवसेना सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे संपर्क प्रमुख महेश साठे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा पंढरपूर शहर व तालुक्याच्यावतीने संघाच्या सदस्यांसाठी आयोजीत करण्यात आलेल्या कार्यशाळे प्रसंगी महेश साठे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमाहिती कार्यालयाचे अविनाश गरगडे हे होते.

तर यावेळी व्यासपीठावर संघाचे पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, शहराध्यक्ष नागेश अदापुरे, राजकुमार घाडगे, राधेश बादले पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पत्रकार संघातील सदस्यांना ओळखपत्राचे वाटप



करण्यात आले.

पुढे बोलताना महेश साठे यांनी सांगितले कि, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने राब विण्यात येणारे उपक्रम हे पत्रकारा बरोबरच समाज हिताचे आहेत. तर पत्रकार संघाकडून सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रामध्ये पार पाडण्यात येत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. पत्रकारीतेच्या माध्यमातून समाजातील चांगल्या वाईट घटनांची मांडणी पत्रकारांनी लावून धरल्यास चांगल्या समाज निर्मितीसाठी त्याचा चांगलाच फायदा होईल. असेही ते यावेळी म्हणाले यावेळी राजेंद्र कोरके पाटील , अविनाश गरगडे यांनी आपल्या मनोगतातून पत्रकारांना मार्गदर्शन केले.

या कार्यकमासाठी संघाचे सचिन कुलकर्णी, विनोद पोतदार, दादा कदम, कुमार कोरे,संजय यादव, राजकुमार घाडगे, रवींद्र कोळी, अश्पाक तांबोळी, नेताजी वाघमारे, मारुती वाघमोडे,अजित देशपांडे,रामदास नागटिळक,रोहन नरसाळे, संतोष मोरे,संजय ननवरे, धनाजी राक्षे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# आंबे येथे श्री अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबिर



पंढरपूर/प्रतिनिधीः विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर तालुक्यातील आयोजित करण्यात आले होते या शिबिरामध्ये सुमारे पाचशे लोकांची तपासणी करण्यात आली आहे पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील राष्ट्रवादीचे लोकप्रिय युवा नेते आणि विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील विविध ठिकाणी गावामध्ये रक्तदान शिबिर तसेच आरोग्य शिबिर यांचे आयोजन करण्यात आले होते याशिवाय कोकणा तालुक्यातील सामाजिक उपकरणा विविध तालुक्यातील शहरातील सर्वसामान्य माणूस अभिजीत पाटील यांचे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ओळख आहे युवा वर्ग मध्ये त्यांची लोकप्रियता वाढत दिसत आहे आंबेगाव मध्ये डोळे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सचिन पाटील कारखान्याचे संचालक सचिन शिंदे महादेव गायकवाड दत्ता शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते

# अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींना जमिनीचा मालकी हक्क देण्यासंदर्भात केंद्र सरकारला शिफारस करणार : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई : अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांना वनहक्काची जमीन उपजीविकेसाठी देण्याची तरतूद कायद्यात आहे. जमिनीचा मालकी हक्क देण्याच्या मागणी संदर्भात केंद्र सरकारला शिफारस पाठविण्यात येणार आहे, असे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी वनहक्काची मान्यता अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ची अंमलबजावणी अन्वये वैयक्तिक वनहक्क धारकांची ७/१२ सदरी भोगवटादार वर्ग २ अशी नोंद घेण्याबाबत महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या संदर्भात आज विधान भवन येथे आयोजित बैठकीत समिती सदस्य मंत्री मुनगंटीवार बोलत होते.

यावेळी समितीचे सदस्य तथा आदिवासी विकास विभाग मंत्री डॉ.विजयकुमार गावित, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, आमदार विनोद निकोले, माजी आमदार जे.पी. गावित, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव प्रदीप व्यास, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी उपस्थित होते.अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनातील निवासींना भूसंपादन मोबदला न मिळणे, शेती कर्ज मिळण्यास होणाऱ्या अडचणी, शासनाच्या इतर शेती विषयक योजनांचा लाभ मिळण्यास येणाऱ्या अडचणी तसेच वनहक्काच्या अनुषंगाने इतर सूचनांबाबत सकारात्मक विचार करून निर्णय घेण्यासाठी ही समिती



गठित करण्यात आली आहे.

महसूल मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, वन निवासींना नियमानुसार चार हेक्टर एवढी जमीन भोगवट्यासाठी अनुज्ञेय आहे. मात्र, धारकांनी केलेल्या अर्जानुसार किती जमीन मंजूर करण्यात आली, किती धारकांनी अर्ज दाखल केले आणि नामंजूर करण्याची कारणे याबाबत जिल्हानिहाय संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात येईल. अहवालाअंती त्यावर समिती चर्चा करून न्याय देण्याच्या अनुषंगाने निर्णय घेणार असल्याचे महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

